# वाळवंटी टोळ उपद्रव व त्याचे व्यवस्थापन

श्री. आर. डी. चव्हाण
विषय विशेषज्ञ (किटकशास्त्र)

डॉ. एन. एस. देशमुख
कार्यक्रम समन्वयक (प्र.)
विषय विशेषज्ञ (प.वि.व दु.शा.)

श्री. एम. व्ही. भोमटे
विषय विशेषज्ञ (कृषिविद्या)

डॉ. एस. जि. पवार
विषय विशेषज्ञ (कृषिअभि.)


कृषी विज्ञान केंद्र, हिवरा, गोंदिया

सध्या वाळवंटी टोळधाड हे राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश तसेच गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान करून ती महाराष्ट्राच्या सिमेलगतच्या जिल्ह्यामध्ये प्रवेश करीत आहेत. वाळवंटी टोळ ही कीड आंतरराष्ट्रीय व बहुभक्षीय कीड असून ती नाकतोड्याच्या गटातील आहे. भारतात प्रामुख्याने टोळधाडीच्या तीन प्रकारच्या प्रजाती आढळतात त्यातील एक म्हणजे वाळवंटी टोळ होय. ही कीड अत्यंत खादाड व नुकसान करणारी असून त्यांच्या एका थव्यामध्ये लाखोने टोळ असतात.

## जिवनक्रम:

या किडीच्या जीवनात तीन अवस्था असतात त्यामध्ये अंडी, पिल्ले/बाल्यावस्था व पुर्ण वाढ झालेली प्रौढावस्था. ही कीड या तीन अवस्थेमधून त्यांचे जिवनक्रम पुर्ण करतात. या किडीची मादी ५० ते १०० अंड्याच्या पुंजक्याने ओलसर रेताड जमिनीत अंडी घालत असून त्यामधून दोन ते चार आठवड्याने अंडी फुटून त्यातून पिल्ले बाहेर पडतात. जमिनीतील ओलावा व हवेतील उष्णतामान यावर अंड्याच्या अवस्थेचा काळ अवलंबून असतो. अंड्यातून जे लहान पिल्ले निघतात त्यांना पंख फुटलेले नसतात, लहान टोळ वाढत असताना तीन ते पाच दिवसांच्या अंतराने पाच वेळा कात टाकतात. अंड्यातून बाहेर आल्यानंतर वाढीच्या अवस्थेत ही कीड चार ते पाच वेळा खालीलप्रमाणे कात टाकते.

- प्रथम अवस्था: अंड्यातून नुकतेच बाहेर पडलेले पिले पांढरे असते व एक ते दोन तासात काळ्या रंगाचे होते.
- दुसरी अवस्था: डोके मोठे व चटकन लक्षात येणारा फिकट गुलाबी रंग या अवस्थेत दिसून येतो.
- तिसरी अवस्था: छातीच्या दोन्ही बाजूस दोन पंखांची जोडी या अवस्थेत दिसून येते.
- चौथी अवस्था: यामध्ये किडीला विशिष्ट काळा व पिवळा रंग दिसून येतो.
- पाचवी अवस्था: यामध्ये विशिष्ट तेजस्वी पिवळा व काळ्या रंगाचा पॅटर्न दिसून येतो.



टोळ किडींच्या विविध अवस्था

### नुकसानीचा प्रकार:

टोळांची सर्व पिल्ले मोठ्या थव्याने एकत्र येवून वाटेतील वनस्पतीचा नाश करून पुढे सरकत असतात, किडीचे हे थवे पुढे सरकत असताना सायंकाळी झाडाझुडपांमध्ये वस्तीस राहतात. पुर्ण वाढलेले प्रौढ स्थितीतील टोळ तांबुस रंगाचे असतात. ते अतिशय चपळ व खादाड असून पिकांचे जास्तीत जास्त नुकसान करतात शिवाय ही टोळधाड दुरवर उडून जात असल्याने अशा टोळधाडीपासून मोठा धोका निर्माण होतो. टोळ कीड हे हिरवी पाने, फुले, फळे, बिया, फांदी तसेच पालवी आदींचा फडशा पाडतात. तांबूस टोळ पूर्णावस्थेत पोहोचल्यावर पिवळ्या रंगाचे होतात. असे पिवळे टोळ अंडी घालण्यास अनुकूल अशी ओलसर रेताड जमिनीच्या शोधात फिरतात. या टोळांचे थवे ताशी १२ ते १६ कि.मी. वेगाने उडत असतात.

### आर्थिक नुकसानीची पातळी:

- १०,००० प्रौढ/हेक्टर किंवा ५ ते ६ पिल्ले/झुडूप

### नियंत्रणाचे उपाय:

- टोळ किडीने अंडी घातलेल्या जागा शोधून जमिनीच्या भोवताली चर खोदल्यास पिलांना अटकाव करून नियंत्रण करता येते. अंडी शोधून सामुहिकरित्या नष्ट करावीत.
- टोळाची सवय थव्या-थव्याने एका दिशेने दौडत जाण्याची आहे. त्यामुळे पुढे येणाऱ्या थव्यांच्या वाटेवर ६० से.मी. रुंद, ७५ से.मी. खोल चर खणुन त्यात या पिलांना पकडता येते.
- संध्याकाळी, रात्रीच्या वेळी झाडाझुडपावर टोळ जमा झाल्यास शेतामध्ये मशाली पेटवून तसेच टायर जाळून धुर केल्याने नियंत्रण होते.
- थव्यांच्या स्थितीत पिलांची संख्या जास्त असल्यास निम तेल प्रती हेक्टर २.५ लि. फवारणी केल्यास प्रभावी परिणाम दिसून येतात.

(संपर्क: +९१ ७२१८३८१९४७)

★ ★ ★

## प्रगतशील व प्रयोगशील शेतकऱ्यांनो लिहते व्हा....

कृषीपर्व मासिक हे प्रगतशील व प्रयोगशील शेतकरी बांधवांना अत्यंत चांगले माध्यम उपलब्ध करून देत आहे. यामध्ये आपण केलेले प्रयोग, आपण साधलेली प्रगती, आपले अनुभव, विचार, शेतीविषयक सल्ले, मार्गदर्शन यावर लेख लिहू शकता. हे लेख तमाम शेतकरी बांधवांना मार्गदर्शक ठरतील जे कि आपली शेती तुमच्या अनुभवातून पूर्ण करू शकतात. तरी शेतकरी, कृषी पत्रकार, लेखक यांना विनंती आहे कि, त्यांनी आपल्या यशोगाथा व प्रयोगशीलतेचे लेख krushiparvmagazine@gmail.com या मेल आयडी वर प्रत्येक महिन्याच्या २० तारखेपर्यंत पाठवावे.

अधिक माहितीसाठी संपर्क करा: + ९१ ९४२३७२१८९४ / +९१ ९१७२२४६२४४